RNI No. MAHBIL/064/13/1/2012
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक - नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - १५, अंक - २ ] सोमवार, जुलै १३, २०२६ / आषाढ २२, शके १९४८ [ पृष्ठे ०८

**असाधारण क्रमांक २**

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय/संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक १ जुलै २०२६

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

**सूचना**

क्रमांक टीपीएस-१५२५/११९५/प्र.क्र.१७१/२०२५/नवि-९.— ज्याअर्थी, धडगाव-वडफळ्या-रोषमाळ शहराची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) (यात यापुढे “उक्त अधिनियम” असे संबोधिले आहे) चे कलम ३१ चे उप-कलम *(१)* अन्वये शासनाच्या नगर विकास विभागाने निर्णय क्रमांक टीपीएस-१५२५/११९५/प्र.क्र.१७१/२०२५/वि.यो. मंजुरी (भागशः)/नवि-९, दिनांक २३ एप्रिल २०२६ अन्वये भागशः मंजूर केली असून ती दिनांक ५ जून २०२६ पासून अंमलात आली आहे (यात यापुढे “उक्त विकास योजना” असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, मौजे रोषमाळ (बुद्रुक) येथील सर्व्हे क्रमांक १९९/१/२ मधील क्षेत्रावर (यात यापुढे “उक्त क्षेत्र” असे संबोधिले आहे) “आरक्षण क्रमांक १५-दुकान केंद्र”, १२.०० मीटर रुंद विकास योजना रस्ता, ४५.०० मीटर रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित असून काही क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट आहे (यात यापुढे “उक्त विकास योजना प्रस्ताव” असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त क्षेत्रावर न्यायालयीन इमारतीचे बांधकाम प्रस्तावित आहे, मात्र उक्त विकास योजना प्रस्तावांमुळे उक्त क्षेत्रावर न्यायालयीन इमारतीचे प्रयोजनात काही अडचणी येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत खालील फेरबदल (यात यापुढे ज्याचा उल्लेख “उक्त प्रस्तावित फेरबदल” असा करण्यात आलेला आहे) करणे आवश्यक झाले आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

उक्त प्रस्तावित फेरबदल - मौजे रोषमाळ (बुद्रुक) येथील सर्व्हे क्रमांक १९९/१/२ मधील--

(i) “आरक्षण क्रमांक १५-दुकान केंद्र” वगळून मुक्त झालेले क्षेत्र सार्वजनिक/निम-सार्वजनिक विभागात समाविष्ट करणे,

(ii) सर्व्हे क्रमांक १९९/१/२ मधील जागेच्या दक्षिण भागातून जाणाऱ्या १२.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्याची आखणी सुधारित करून दक्षिणेकडे सरकविणे व यामुळे मुक्त होणारे क्षेत्र सार्वजनिक/निम-सार्वजनिक विभागात समाविष्ट करणे,

(iii) ४५.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्याची रुंदी ३० मीटर करून सर्व्हे क्रमांक १९९/१/२ मधील मुक्त होणारे क्षेत्र सार्वजनिक/निम-सार्वजनिक विभागात तर इतर क्षेत्र लगतच्या मोठ्या वापर विभागात समाविष्ट करणे व

(iv) सर्व्हे क्रमांक १९९/१/२ मधील रहिवास विभागातील क्षेत्र सार्वजनिक/निम-सार्वजनिक विभागात समाविष्ट करणे.

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ *(१ क क) (क)* अन्वये प्राप्त अधिकारात आणि तदनुषंगिक शक्तींचा वापर करून उक्त प्रस्तावित फेरबदलावर जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिद्ध करीत आहे. उक्त प्रस्तावित फेरबदलावरील कोणत्याही सूचना/हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत विभागीय सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांना प्राप्त सूचना/हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

विभागीय सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, पहिला मजला, प्रशासकीय इमारत, आयुक्त कार्यालय, नाशिक रोड, नाशिक-४२२१०१ यांचेकडे सदर सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या विहित कालमर्यादेत उक्त प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या हरकती/सूचना स्वीकारून विचारात घेण्यात येतील.

सदर सूचना, प्रस्तावित सारभूत बदल दर्शविणाऱ्या नकाशासह जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयांत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत व दिवशी उपलब्ध करणेत येत आहे.

१. विभागीय सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक.

२. सहायक संचालक, नगररचना, नंदुरबार शाखा, नंदुरबार.

३. मुख्याधिकारी, धडगाव-वडफळ्या-रोषमाळ नगरपंचायत, जिल्हा नंदुरबार.

सदरची सूचना महाराष्ट्र शासनाचे **www.maharashtra.gov.in** (कायदे व नियम) संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,*

**सुलेखा वैजापूरकर,**
सहसचिव,
महाराष्ट्र शासन.

---

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032

Dated 1st July 2026

*The Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966*

**Notice**

No. TPS-1525/1195/CR.171/2025/UD-9.— Whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department *vide* it's Notification No. TPS-1525/1195/CR-171/2025/D.P. Sanction(Partly)/UD-9, dated the 23rd April 2026 has partly sanctioned the Development Plan of Dhadgaon-Vadfalya-Roshmal, under Section 31 *(1)* of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") and the same came into force with effect from the 5th June 2026 (hereinafter referred to as "the said Development Plan");

and whereas, in the said Development Plan, the land bearing Survey No. 199/1/2 of Mauje Roshmal (Bk.) (hereinafter referred to as "the said Land") is reserved as "Site No. 15- Shopping Centre", 12.00 mtrs. wide Development Plan Road, 45.00 mtrs. wide Development Plan Road and some area is included in Residential Zone (hereinafter referred to as "the said Development Plan Proposals");

and whereas, it has come to the notice of the Government that, there are some difficulties arises in a construction of the Court building proposed on the said Land;

and whereas, after consulting the Director of the Town Planning, Maharashtra State, Pune, the Government of Maharashtra is of the opinion that, it is necessary to carry out modifications to the said Development Plan, as mentioned below (hereinafter referred to as "the said Modification Proposals")-

The said Modification Proposals - In the said Land,

(i) "Site No. 15-Shopping Centre" is proposed to be deleted and the land so released, is proposed to be included Public/Semi-Public Zone,

(ii) The alignment of 12.00 mtrs. wide Development Plan Road, passing through the Southern portion of Survey No. 199/1/2 is proposed to be revised by moving the alignment towards the Southern side and the land so released, is proposed to be included in Public/Semi-Public Zone,

(iii) The width of 45.00 mtrs. wide Development Plan Road is proposed to be curtailed to 30.00 mtrs. and the land so released from Survey No. 199/1/2 is proposed to be included Public/Semi-Public Zone and the remaining land so released is proposed to be included in adjacent Zone and

(iv) Some Portion of Survey No. 199/1/2 is proposed to be deleted from Residential Zone and the land so released is proposed to be included in Public/Semi-Public Zone.

Now therefore, in exercise of the powers conferred under Section 37 *(1AA) (A)* of the said Act and all other powers enabling in that behalf, the Government hereby publishes a notice for inviting suggestions/objections from General Public in respect to the said Modification Proposals. Any objections/suggestions upon the said Modification Proposals, shall be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this Notice in Maharashtra Government Gazette, to the Divisional Joint Director of Town Planning, Nashik Division who is hereby authorized as an Officer to hear objections/suggestions and say of concerned Planning Authority, as applicable and submit his report to the Government.

Only the suggestions and/or objections regarding the said Modification Proposals, that may be received by the Divisional Joint Director of Town Planning, Nashik Division, having his office at 1st Floor, Administrative Building, Commissioner Office Premises, Nashik Road, Nashik-422101, within the stipulated period of 30 days from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette shall be considered.

Copy of the said Notice along with the plan showing the said Modification Proposals shall be made available for inspection to general public at the following offices during office hours on all working days.

1) The Divisional Joint Director of Town Planning, Nashik Division, Nashik.

2) The Assistant Director of Town Planning, Nandurbar Branch, Nandurbar.

3) The Chief Officer, Dhadgaon-Vadfalya-Roshmal Municipal Council, district Nandurbar.

This Notice shall also be made available on the Government website **www.maharashtra.gov.in** (Acts/Rules).

*By Order and in the name of the Governor of Maharashtra,*

**SULEKHA VAIJAPUKAR,**
Joint Secretary to Government.

## जिल्हाधिकारी यांजकडून

*भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ अन्वये*

**प्राथमिक अधिसूचना**

**जिल्हा नाशिक**

क्रमांक भूसं / कक्ष / १० / ३ / काबि -२०४/सन २०२६.— ज्याअर्थी, भूमी संपादन, पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(इ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७(भाग-२)/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड ए)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०००० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या नाशिक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांस यासोबत जोडलेल्या अनुसूची "एक" मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनी (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त जमिनी" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करणेत आला आहे) आवश्यक आहेत अथवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची "दोन" मध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* चे तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची "तीन" मध्ये दिलेली आहेत;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची "चार" मध्ये दिलेला आहे;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम *(१)* अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची "पाच" मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण "चार" खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनींचा अथवा त्यांच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनींवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

परंतु, उक्त जमिनींच्या अथवा त्यांच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लघंन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(५)* अनुसार, जिल्हाधिकारी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप-नियम *(३)* द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचेदेखिल घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* [कलम ३ *(जी)*] अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांचेकडील आदेश क्रमांक भूसं/कक्ष/१०/३/काबि/एसआर/५८/२०२५, दिनांक ११ डिसेंबर २०२५ व सुधारित आदेश क्रमांक भूसं/कक्ष/१०/३/काबि/एसआर/७८/२०२५, दिनांक २३ डिसेंबर २०२५ अन्वये उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक यांस पदनिर्देशित करीत आहेत.

**अनुसूची - एक**

**संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन**

**जिल्हा नाशिक, तालुका नाशिक, मौजे जलालपूर**

**प्रकरण क्रमांक ९/२०२५**

| भूमापन किंवा गट क्रमांक | | संपादन करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | हे. आर/चौ.मी. |
| ५६/२/१ पैकी | .. | ०.१४०० |
| ५६/२/२ पैकी | | |
| ५७ पैकी | .. | १.१५५० |
| १५६/१/७ पैकी | .. | ०.६७५० |
| १५६/२/१ पैकी | .. | ०.२८०० |

**अनुसूची - एक** — *चालू*

| भूमापन किंवा गट क्रमांक १ | | संपादन करावयाचे क्षेत्र २ हे. आर/चौ.मी. |
|---|---|---|
| १६८/२ पैकी | .. | ०.८५५० |
| १६९ पैकी | .. | १.०६५० |
| १७०/१ पैकी | .. | ०.०९०० |
| १७०/२ पैकी | | |
| १७१ पैकी | .. | १.२९५० |
| १८५/१ पैकी | .. | ०.०७५० |
| १८८ पैकी | .. | ०.०१५० |
| १९०/१ पैकी | .. | १.३००० |
| १९०/२ पैकी | | |
| १९१ पैकी | .. | ०.३२०० |
| १९२/१ पैकी | .. | ०.४७०० |
| १९२/२ पैकी | | |
| १९३ पैकी | .. | ०.०२०० |
| १९५/१ पैकी | .. | ०.१८०० |
| १९५/२ पैकी | | |
| १९५/३ पैकी | | |
| १९६/१ ते ४/३/२ पैकी | .. | ०.९९५० |
| १९६/१ ते ४/३/१ पैकी | .. | ०.०७०० |
| १९६/२/१ ते ४/२/प्लॉट १ पैकी | .. | ०.०२३७ |
| १९६/२/१ ते ४/२/प्लॉट २८ पैकी | .. | ०.००३७ |
| १९६/२/१ ते ४/२/प्लॉट २९ पैकी | .. | ०.०३१३ |
| २०० पैकी | .. | ०.३७५० |
| **एकूण क्षेत्र** | .. | **९.४३.३७** |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :** नाशिक शहराच्या प्रस्तावित परिक्रमा मार्ग (रिंगरोड) करिता.

**प्रकल्पाच्या कार्याचे वर्णन :** नाशिक परिक्रमा मार्ग DRDO जंक्शन आडगाव-दिंडोरी रोड, ढकांबे शिवार-राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८४८, पेठ गवळीवाडा-गंगापूर रोड-गोवर्धन-त्र्यंबक महामार्ग-बेळगाव ढगा-नाशिक-मुंबई महामार्ग-विल्होळी राज्य महामार्ग क्रमांक ६०, सिन्नर फाटा व आडगाव येथील परिक्रमा मार्गाचे बांधकामाकरिता-मौजे जलालपूर, तालुका-जिल्हा नाशिक येथील एकूण खाजगी क्षेत्र ९.४३.३७ हे.आर भूसंपादन करणे-बाबत.

**समाजाला होणारे लाभ :** सार्वजनिक दळणवळण व्यवस्था बळकटीकरण.

**अनुसूची - तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :**
लागू नाही.

**अनुसूची - चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश** (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) : सदरचा मौजे जलालपूर तालुका-जिल्हा नाशिक येथील नाशिक शहराच्या प्रस्तावित परिक्रमा मार्ग (रिंगरोड) या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असल्याने, S.I.A. सुट मिळणेबाबत नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ (सन २०१८ महाराष्ट्र सुधारणा अधिनियम) मधील कलम १०-क मधील उक्त प्रकल्पास उक्त अधिनियमाच्या प्रकरण-दोन व प्रकरण-तीन च्या तरतुदी लागू करण्यापासून लोकहितास्तव सुट देण्याबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-मध्य उपविभाग, गुरुवार ते बुधवार, मे १४-२०, २०२६ कालावधीत प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**अनुसूची - पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**(अ)** प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम : लागू नाही.

**(ब)** प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता : लागू नाही.

**(क)** ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील : लागू नाही.

**टीप.–** उक्त जमिनींच्या आराखड्याचे सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर, उपविभाग इगतपुरी-त्र्यंबकेश्वर, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक याच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**आयुष प्रसाद,**
जिल्हाधिकारी, नाशिक.

नाशिक, २ जुलै २०२६.

*भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये घोषणा*

**अधिसूचना**

**जिल्हा नाशिक**

क्रमांक भूसं/कक्ष/१०/३/कावि-२१७/सन २०२६.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नाशिक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून कलम ११ ची अधिसूचना क्रमांक भूसं/कक्ष/१०/३/कावि-६८/२०२६ दिनांक १५ मार्च २०२६ रोजी काढली आहे, आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची "एक" मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची "दोन" मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, नाशिक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी, कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची "तीन" मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची "चार" मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**

**संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन**

**जिल्हा नाशिक, तालुका नाशिक, मौजे महादेवपूर**

**प्रकरण क्रमांक ०७/२०२६**

| सर्व्हे नंबर/ गट नंबर | | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | चौ.मी. |
| १२ पैकी | .. | ०.०७०० |
| १७ पैकी | .. | ०.०९०० |
| १५ पैकी | .. | ०.१६०० |
| १४ पैकी | .. | ०.०७५० |
| ३५/१ पैकी | .. | ०.०५५० |
| ३५/२ पैकी | .. | ०.७०५० |
| ३० पैकी | .. | ०.०५५० |
| ३१ पैकी | .. | ०.०३०० |
| २९ | .. | ०.०९०० |
| २८ पैकी | .. | ०.१६०० |
| २७ पैकी | .. | ०.६१०० |
| २६/२ पैकी | .. | ०.८००० |
| २६/१/१ पैकी | .. | ०.०३५० |
| २६/१/४ पैकी | .. | ०.२०६० |
| २६/१/१ पैकी | .. | ०.०५५० |
| २६/१/२ पैकी | | |
| २६/१/३ पैकी | | |
| २६/१/४ पैकी | | |
| २६/२ पैकी | | |
| ५६/१ पैकी | .. | ०.३४०० |
| ५६/२ पैकी | | |
| ५७/१ पैकी | .. | ०.०३०० |
| ५७/२ पैकी | | |
| ५७/३ पैकी | | |
| १३ पैकी | .. | ०.८३०० |
| १६ पैकी | .. | ०.३२०० |
| **एकूण क्षेत्र** | .. | **४.७१६०** |

## अनुसूची - दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव :** मौजे महादेवपूर, तालुका-जिल्हा नाशिक येथील नाशिक शहराच्या परिक्रमा मार्ग (रिंगरोड) करिता भूसंपादन करणे.

**प्रकल्पाच्या कार्याचे वर्णन :** नाशिक परिक्रमा मार्ग DRDO जंक्शन-आडगाव-दिंडोरी रोड-ढंकाबे शिवार-राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८४८ ते गवळीवाडा-गंगापूर रोड, गोवर्धन-त्र्यंबक महामार्ग-बेळगाव ढगा-नाशिक-मुंबई महामार्ग-विल्होळी-राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६०-सिन्नर फाटा व आडगाव येथील परिक्रमा मार्गाचे बांधकामाकरिता मौजे महादेवपूर, तालुका-जिल्हा नाशिक येथील एकूण क्षेत्र ४.७१६० भूसंपादन करणेकरिता.

**समाजाला होणारे लाभ :** सार्वजनिक दळणवळण व्यवस्था बळकटीकरण.

## अनुसूची - तीन

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन :** लागू नाही.

## अनुसूची - चार

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश :** लागू नाही.

**टीप.–** उक्त जमिनींच्या नकाशाचे सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे निरीक्षण करता येऊ शकेल.

**आयुष प्रसाद,**
जिल्हाधिकारी, नाशिक.

नाशिक, ३ जुलै २०२६.

---

*भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये घोषणा*

## अधिसूचना

**जिल्हा नाशिक**

क्रमांक भूसं/कक्ष/१०/३/कावि-२२३/सन २०२६.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नाशिक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून कलम ११ ची अधिसूचना क्रमांक भूसं/कक्ष/१०/३/कावि-०६/२०२६ दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी काढली आहे, आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची "एक" मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची "दोन" मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, नाशिक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी, कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची "तीन" मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची "चार" मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक

## संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

**जिल्हा नाशिक, तालुका नाशिक, मौजे मुंगसरे**

**प्रकरण क्रमांक ०८/२०२५**

| सर्व्हे नंबर/ गट नंबर | | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | चौ.मी. |
| ३६४-ब | .. | ०.०१०० |
| ३६४-क | .. | ०.३२०० |
| ३६४-ड | .. | ०.७२८० |
| ३६१-अ | .. | ०.५४९० |
| ३६१-ब | | |
| ३६१-क | | |

**अनुसूची - एक** — *चालू*

| सर्व्हे नंबर/ गट नंबर | | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | चौ.मी. |
| ३६२ | .. | ०.१२४० |
| ३५३ | .. | ०.०४५५ |
| ३६० | .. | ०.२१४४ |
| ३५९ | .. | ०.३००० |
| ३५८ | .. | ०.०२६१ |
| ३५७ | .. | ०.०७०० |
| ३५६ | .. | ०.५४२० |
| ३५५ | .. | ०.१००० |
| ३२१ | .. | ०.१२२० |
| ३२२ | .. | ०.३३९२ |
| ३२३ | .. | ०.४९७३ |
| ३२४/१ | .. | ०.७५०० |
| ३२४/२ | | |
| २४९/१ | .. | ०.११५२ |
| २४९/२ | .. | |
| २४९/३ | .. | |
| २४८ | .. | ०.५०४५ |
| २५१ | .. | ०.६१०० |
| २५२/१ | .. | ०.७४०० |
| २५२/२ | | |
| २३८/१ | .. | ०.४१५० |
| २३८/२ | | |
| २३९ | .. | ०.२३०० |
| २३६/१ | .. | १.०१०० |
| २३६/२ | | |
| २३७ | .. | ०.११५० |
| **एकूण क्षेत्र** | .. | ८.४७७२ |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :** मौजे मुंगसरे, तालुका-जिल्हा नाशिक येथील नाशिक शहराचा परिक्रमा मार्ग (रिंगरोड) करिता भूसंपादन करणे.

**प्रकल्पाच्या कार्याचे वर्णन :** नाशिक परिक्रमा मार्ग DRDO जंक्शन-आडगाव-दिंडोरी रोड-ढंकाबे शिवार-राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८४८ ते गवळीवाडा-गंगापूर रोड, गोवर्धन-त्र्यंबक महामार्ग-बेळगाव ढगा-नाशिक-मुंबई महामार्ग-विल्होळी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६० सिन्नर फाटा व आडगाव येथील परिक्रमा मार्गाचे बांधकामाकरिता मौजे मुंगसरे, तालुका-जिल्हा नाशिक येथील एकूण क्षेत्र ८.४७७२ भूसंपादन करणेकरिता.

**समाजाला होणारे लाभ :** सार्वजनिक दळणवळण व्यवस्था बळकटीकरण.

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन :** लागू नाही.

**अनुसूची - चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश :** लागू नाही.

**टीप.–** उक्त जमिनींच्या नकाशाचे सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे निरीक्षण करता येऊ शकेल.

**आयुष प्रसाद,**
जिल्हाधिकारी, नाशिक.

नाशिक, ८ जुलै २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.